# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २८८- २३ दिनांक :- २९/०८/२०२३.

## भांडणाचा राग मनात धरुन खुन करुन ८ वर्ष फरार असलेल्या मुख्य आरोपीला उत्तरप्रदेश राज्यातुन अटक करण्यात गुन्हे शाखा- कक्ष २, वसई यांना यश.

तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं १५६/२०१६ भादविस कलम ३०२, ४०४, २०१, ३४ प्रमाणे या गुन्हयातील फिर्यादी चंद्रशेखर रामसागर गुप्ता वय ३० वर्ष रा. केशव अपार्टमेंट, रुम नं २०५, वालईपाडा रोड, संतोषभवन, नालासोपारा पुर्व यांनी दि. १७/०३/२०१६ रोजी १७.०० वाजता ते दिनांक १८/०३/२०१६ रोजी १७.०० वाजता ते दिनांक १८/०३/२०१६ रोजी ००.३० वाजता ००.४५ वाजताचे दरम्यान गुन्हयातील आरोपीत १) शिवाभैया पुर्ण नाव पत्त माहीत नाही २) रवि श्यामवीर डांगुर ३) अभिजित मिश्रा उर्फ कडा उर्फ सचिन ४) कृष्णा कमलेश दुबे यांनी आपसात संगनमत करुन गुन्हयातील फिर्यादी यांचा मयत भाऊ नामे सुभाषचंद उर्फ भालू रामसागर गुप्ता वय २१ वर्ष रा. फिर्यादी प्रमाणे याचे सोबत झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन नायलॉन रस्सीने मयताचा गळा आवळुन त्यास जिवे ठार मारुन त्याचा मृतदेह पुरावा नष्ट करण्याच्या ईरादयाने गोणीत भरुन त्याचे अंगावर असलेल्या सोन्याची चैन व हाताच्या बोटातील सोन्याची अंगठी व मो.सा.अपहार करुन पळून गेले बाबत फिर्यादी यांनी दिनांक १८/०३/२०१६ रोजी ०३.४५ वाजता दिलेल्या तक्रारीवरुन सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील विविध गंभीर गुन्हयांतील पाहीजे व फरार निष्पन्न परंतु नजेराआड असणारे आरोपीत यांचा शोध घेवून अटक करण्याबाबत वरीष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते.

त्याप्रमाणे तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं १५६/२०१६ भादविस कलम ३०२, ४०४, २०१, ३४ प्रमाणे या गुन्हयाचे झाले तपासाबाबत व गुन्हयात अटक करण्यात आलेल्या आरोपीतांची पोलीस ठाण्यातुन माहीती प्राप्त करण्यात आली. नमुद गुन्हयात १ विधीसंघर्षग्रस्त बालक व २ आरोपीतांना अटक करण्यात आली असून शिवाभैया पुर्ण नाव पत्त्माहीत नाही हा मुख्य पाहीजे आरोपीत असल्याची माहीती निदर्शनास आली. गुन्हयाचे फिर्यादी व साक्षीदार यांची प्रत्यक्ष भेट घेवून त्यांचेकडे गुन्हयाचे घटनेच्या प्रकाराबाबत सविस्तर माहीती प्राप्त करुन सदर माहीतीव्दारे तपास करुन पाहीजे आरोपीत हा रा.मजरा चिल्लीमल राजापुर, जिल्हा- चित्रकुट, राज्य- उत्तरप्रदेश येथील राहणारा असुन त्याचे हातावर असलेल्या टॅटुचे वर्णन आणि बरेच वर्षापुर्वीचा जुना अस्पष्ट फोटो प्राप्त करण्यात आला. मिळालेल्या माहीतीच्या अनुषंगाने नमुद पाहीजे आरोपीताचे निष्पन्न झालेल्या पत्यावर गुप्त बातमीदारांकरवी आरोपीताचा फोटो आणि त्याचे हातावरील टॅटुचे वर्णनावरुन शोध चालू झाला. सदर गुप्त बातमीदारांकडुन प्राप्त जुन्या फोटो आणि टॅटुचे वर्णनाशी मिळता-जुळता व्यक्ती मजरा चिल्लीमल, ता. राजापुर, जिल्हा-चित्रकुट, राज्य- उत्तरप्रदेश परीसरात वास्तव्यास असल्याची माहीती प्राप्त झाल्याने तात्काळ तपास पथक चित्रकुट, राज्य- उत्तरप्रदेश येथे रवाना करुन आरोपीतास दिनांक २७/०८/२०२३ रोजी ताब्यात घेण्यात आले. त्याचेकडे नमुद गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता त्याने सदरचा ८ वर्षापुवी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली.

<u>अटक करण्यात आलेल्या पाहीजे आरोपीताचे नाव :-</u> शिवबाबु उर्फ शिवाभैया जगतपाल निषाद वय-२० वर्ष, रा.- कलेक्टर पुर्वा मजरा चिल्लीमल, ता. राजापुर, जिल्हा-चित्रकुट, राज्य-उत्तरप्रदेश

सदर गुन्हयाच्या समांतर तपासादरम्यान गुन्हयातील ८ वर्ष अटकेपासुन बचाव होण्याकरीता लपत फिरत असलेल्या पाहीजे आरोपीताचा अथक परीश्रम करुन प्राप्त केलेल्या जुना अस्पष्ट फोटो आणि टॅटुचे वर्णन याव्दारे चित्रकुट, राज्य- उत्तरप्रदेश या ठिकाणी गुप्त बातमीदाराकरवी शोध घेवून त्यास अटक करण्यात आले.

सदरची कामगिरी मा.श्री अविनाश अंबुरे पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, सहा.फौज.रमेश भोसले, संजय नवले, पोहवा/०३०७६ प्रफुल्ल पाटील, पो.हवा. चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, दादा आडके, सुधीर नरळे, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अं. अमोल कोरे, सर्व नेम- गुन्हे शाखा-२ वसई, तसेच पो.उप.निरी. राजेश कुमार राय, आरक्षी/ महेंद्रकुमार नेम- सरधुवा पोलीस ठाणे यांनी केली आहे.




---ooo---